पुस्तकांवर प्रेम करणारा माणूस

लेखिका: जीन फ्रिट्झ

चित्रे: ग्रिना हायमन

फार फार वर्षांपूर्वी आयर्लंडमध्ये *कोलंबा* नावाचा माणूस राहात होता. त्याला पुस्तके खूप आवडत असत. त्याकाळी पुस्तक ही एक नवखी गोष्ट होती. त्यामुळे कोलंबाला नवी पुस्तके शोधण्यास बऱ्यापैकी कष्ट पडत. जेव्हा एखादे नवे पुस्तक हाती लागे, तेव्हा तो हाताने लिहून त्याची प्रत तयार करत असे. पण अनेक लोकांना आपल्या पुस्तकांचा मत्सर वाटे. ते कोलंबाला आपल्याकडील नवी पुस्तके वाचायला देत नसत.

*लोंगारॅड*लाही मत्सर वाटत असे. तो त्याची पुस्तके कोलंबाच्या नजरेस पडू देत नसे.

फिनियन हा कोलंबाचा जवळचा मित्र होता. तो कोलंबाला त्याची पुस्तके पाहायला देत असे, पण त्याची नवी प्रत लिहायला देत नसे.

पण एका काळोख्या रात्री....

इथेच नाट्य सुरू होते आणि ते संपण्याआधी, त्यात महाराज आणि आयरिश सैन्य यांचा सहभाग सुरू होतो.

संत कोलंबा, संतांमध्ये सर्वाधिक दयाळू आणि प्रेमळ होते. ते पुस्तकप्रेमींचे आश्रयदाते होते. त्यांच्या कहाणीत, काही सत्याचे तर काही दंतकथेचे अंश आहेत. पण त्यात संघर्ष आणि हास्यरस आहे. ही कहाणी कोलंबाला आपल्या करारी आवाजात लोकांना ऐकवावीशी वाटली असती, हे निश्चित. या कहाणीतील चित्रेही अतिशय सुंदर आहेत.



पुस्तकांवर प्रेम करणारा माणूस

मराठी अनुवादः सुशील मेन्सन



फार फार वर्षांपूर्वी आयर्लंडमध्ये कोलंबा नावाचा एक माणूस राहात होता. त्याचे पुस्तकांवर फार प्रेम होते. खरंतर, पुस्तके हे त्याचे वेडच होते. पण त्याकाळी आयर्लंडमध्ये पुस्तक ही एक नवखी गोष्ट होती. त्यामुळे पुस्तक वाचायला मिळणे ही एक मोठी मुश्किल बाब होती. कुणाला पुस्तक वाचावेसे वाटले तर, ते पुस्तक शोधायलाच दूरदूर प्रवास करावा लागे. ते पुस्तक स्वत:साठी हवे असेल तर त्याला ते हाताने लिहून काढावे लागत असे.

कोलंबाला कथाच वाचायच्या असत्या तर काहीच अडचण नव्हती. तिथे गावोगावी फिरून लोकांना कथा ऐकवणारे भाट होते. त्यांच्याकडील कथा भव्यदिव्य आणि रोचक असत. त्या कथांचे शब्दनशब्द भाटांच्या स्मरणात असत. पिढ्यानपिढ्या त्या कथा समाजात प्रचलित होत्या. कथा ऐकवल्यानंतर, भाट आपल्या भाल्याच्या टोकाला टांगलेला एक सोन्याचा कटोरा लोकांमध्ये फिरवत असत. मग लोक त्यात पैसे टाकत असत. लोकांनी त्यात पुरेसे पैसे टाकले की भाट त्यांची स्तुती करणारे गीत गात असत. पण लोकांनी कंजुषी केली तर भाट त्यांच्या कंजुषी वृत्तीवर गीत रचून गात असत. परिणामी, लोक भाटाला नेहमी खुश ठेवण्याचा प्रयत्न करत असत.

कोलंबाला या जुन्या कथा ऐकायला फार आवडत असे. तो एका सरदाराचा मुलगा असल्यामुळे एका प्रसिद्ध भाटाकडून कथा सांगायला शिकला होता. पण वाचायला शिकल्यावर मात्र त्याला पुस्तकांशिवाय काही सुचेनासे झाले.

कोलंबा लहान वयातच शिकला. तो लहान होता तेव्हा एके रात्री, एक प्रेषित ताऱ्यांचे निरीक्षण करत होता. त्याने आकाशात तयार झालेला एक संदेश वाचला, “कोलंबाने आता वाचन सुरू केलं पाहिजे.” मग वर्णमालेतील अक्षरांना एका केकमध्ये शिजवून त्याने तो केक कोलंबाला खायला दिला. केक खाऊन त्यातील अक्षरे पचल्यावर कोलंबा त्यांचा अभ्यास करू लागला. थोड्या काळातच, तो मेणाच्या पाटीवर अक्षरे लिहायला आणि वाचायला शिकला. त्याकाळी फार कमी लोक लिहू-वाचू शकत होते. अनेकांना त्याची गरजच जाणवत नव्हती. लिहा-वाचायला शिकले तर स्मरणशक्तीचे काय होईल? कथा पुस्तकात छापलेली असेल तर आठवायची गरज काय? भाटांची गरज उरेल का? वगैरे शंका ते व्यक्त करत. पण कोलंबाच्या मते, आयर्लंडमध्ये भाट आणि पुस्तके या दोहोंना स्थान होते. त्यामुळे दोहोंना सन्मान मिळायला हवा होता.

वय वाढल्यावर कोलंबा एक धिप्पाड पुरूष बनला. त्याचा करारी आवाज मैलभर अंतरावरूनही ऐकू येत असे. तो जे काही करायचा ते अगदी मनापासून. पुस्तकांव्यतिरिक्त, कोलंबाचे आयर्लंडवर प्रेम होते. आयरिश गवताचे प्रत्येक पाते, आयर्लंडची गवताळ कुरणे, इंच इंच जमीन यांवर त्याचे प्रेम होते. त्याला तेथील चर्चही आवडत असे. आपले चर्चवरील प्रेम दर्शवण्यासाठी त्याने ऐहिक जीवन सोडून दिले होते. तो घोड्याच्या आयाळीपासून बनलेला एक काटेरी, खडबडीत सदरा अंगात घालत असे. झोपताना उशी म्हणून तो दगड डोक्याखाली घेत असे.



पण कोलंबाच्या पुस्तकांवरील प्रेमाच्या आड ना आयर्लंड आले ना चर्च. तो आयर्लंडमध्ये आलेले प्रत्येक पुस्तक वाचत असे. वाचलेल्या प्रत्येक पुस्तकाची तो लिहून प्रत काढत असे. पुस्तके सहसा मठांमध्ये मिळत असत. त्यामुळे कोलंबाचा बराचसा वेळ एका मठातून दुसऱ्या मठात चालत जाण्यात खर्च होत असे. पण यात एक अडचण होती. मठातील भिक्षुकांना काहीवेळा त्यांच्या पुस्तकांबद्दल मत्सर वाटत असे. आपल्या पुस्तकाच्या प्रती काढणे त्यांना मंजूर नसे. त्यामुळे कोलंबा लांब लांब ढांगा टाकत येताना दिसला की ते एकमेकांना सूचना देत, “लवकर, पुस्तकं लपवा.” मग कोलंबा तिथे पोहोचल्यावर ते मान हलवून म्हणत, “नाही, नवी पुस्तकं नाहीत इथे.”

एके दिवशी कोलंबाने ऐकले की लोंगारॅड नावाच्या एका साधूकडे एक पुस्तक आहे, जे कोलंबाने कधीही पाहिलेले नव्हते. कोलंबा त्वरीत त्या साधूकडे गेला. लोंगारॅडने त्याच्याकडे असे पुस्तक असल्याचे मान्य केले, पण ते कोलंबाला पाहू देण्यास त्याने नकार दिला.
कोलंबाने साधूला खूप आर्जवे केली, पण साधूने आपला नन्नाचा पाढाच सुरू ठेवला. शेवटी कोलंबाच्या तळपायाची आग मस्तकात गेली.
“तुझी पुस्तके तुला फळणार नाहीत!” कोलंबाने त्याला शाप दिला. उद्विग्न होऊन तो तिथून निघाला.

एकदा कोलंबाचा जवळचा मित्र फिनियन रोमच्या दौऱ्यावरून परतला. त्याने तिथून एक नवीन पुस्तक आणले. फिनियन मित्र असल्यामुळे, कोलंबा मोठ्या उत्साहाने आपली शाई, लेखणी आणि ताडपत्र घेऊन फिनियनला भेटायला त्याच्या मठात गेला. तो आपल्या बगळ्यालाही सोबत घेऊन गेला.

कोलंबाचे मठात स्वागत करून फिनियन म्हणाला, तो पुस्तक जरूर पाहू शकतो, पण त्याची प्रत काढू शकत नाही.

त्या रात्री कोलंबा आणि बगळा ग्रंथालयात गेले. तिथे ते पुस्तक एका दगडी भिंतीला बांधलेल्या साखळीच्या टोकाला जखडून ठेवले होते. कोलंबाने काळजीपूर्वक पुस्तक उघडले. व्वा! काय पुस्तक होते! त्याला स्वर्गीय ठेवा मिळाल्याचा आनंद झाला. माशांच्या आणि फुलांच्या चित्रांनी त्यातील मोठमोठी अक्षरे सजली होती. पानांच्या कडांवर सुंदर सर्पिल वर्तुळे काढली होती. प्रत्येक ओळीत खांद्याला खांदा लावून बसलेल्या गुबगुबीत पक्ष्यांसारखी लहान वर्तुळाकार काळी ठळक अक्षरे बसली होती. “बघ, बगळ्या,” कोलंबा पुटपुटला, “किती सौंदर्य भरलंय यात! अपरिमित सौंदर्य!”

पुढल्या रात्री मठातील सर्व लोक झोपी गेले, तेव्हा कोलंबा त्याची लेखणी आणि ताडपत्रे घेऊन दबक्या पावलाने ग्रंथालयात गेला. मग त्याच्या पुढल्या रात्री, त्याच्या पुढल्या रात्री...तो जात राहीला. त्याच्याकडे पुस्तकातील चित्रे, वर्तुळे यांची नक्षी काढायला वेळ नव्हता. पण त्याने त्यांतील सर्व शब्द लिहून काढले. शेवटी एका रात्रीचे काम शिल्लक राहीले.



पण त्या रात्री फिनियनला संशय आला. त्याने आपल्या एका दूताला ग्रंथालयात पाठवले. दूताला तिथे दोन पुस्तके दिसली. त्यांच्या मध्यभागी मेणबत्तीच्या उजेडात कोलंबा बसला होता. मग कोलंबा आणि फिनियन यांच्यात मोठा वाद झाला. फिनियन म्हणाला की त्याने पुस्तकाची प्रत लिहिण्यास परवानगी दिली नव्हती, त्यामुळे कोलंबाने लिहिलेली प्रत आता तो स्वतःच्या ताब्यात घेणार. कोलंबा म्हणाला की ती प्रत त्याने लिहून काढली होती, त्यामुळे पुस्तकावर त्याचाच हक्क होता. कुणीही मागे हटेना. शेवटी ते आयर्लंडच्या राजाकडे न्याय मागण्यास गेले.



दोघे राजासमोर उभे राहीले. आधी फिनियनने आपले म्हणणे ऐकवले आणि मग कोलंबाने.
राजा आपली मान कधी डावीकडे तर कधी उजवीकडे झुकवत तर्कसंगत विचार करू लागला.

शेवटी त्याने फिनियनला झुकते माप दिले. “वासरू जसे गायीच्या मालकीचे असते, तसेच पुस्तकाची प्रतसुद्धा मूळ पुस्तकाच्या मालकाची असते,” राजा म्हणाला.
हा निर्णय ऐकून कोलंबाचा राग अनावर झाला. “हा निकाल अन्याय्य आहे. मी याचा बदला घेईन,” तो रागारागात म्हणाला.

मग कोलंबा थेट पर्वतराजींमध्ये वास्तव्य करणाऱ्या आपल्या नातलगांकडे गेला. त्याच्या वडिलांच्या सेवेत अनेक वीर योद्धे होते. युद्ध करायला ते एका पायावर तयार असत. कोलंबाने त्यांना आपली कहाणी ऐकवताच ते सर्व राजाच्या सैन्याशी लढायला त्वरीत सज्ज झाले. कोलंबा त्यांच्यासाठी प्रार्थना करू लागला. कोलंबाच्या प्रार्थनेमुळे असेल किंवा त्याच्या वडिलांच्या सैन्यातील वीर योद्ध्यांमुळे असेल, राजाचे सैन्य पराभूत झाले. राजाचे तब्बल तीन हजार सैनिक ठार झाले, तर कोलंबाचा फक्त एक सैनिक ठार झाला. सरतेशेवटी, कोलंबाला आपला बदला घेण्यात यश मिळाले.





पण कोलंबाला या विजयाचे समाधान लाभले नाही. युद्ध समाप्तीनंतर तो मनातून अपार दु:खी झाला. तीन हजार आणि एक इतकी माणसे कालपर्यंत जिवंत होती आणि आज मेलेली आहेत, फक्त एका पुस्तकासाठी. कोलंबा अगदी सर्वसामान्य माणसासारखा वागला होता. तो चर्चच्या पापभीरू माणसासारखा वागला नव्हता. त्याला स्वत:ची लाज वाटू लागली. स्वत:ला मोठ्यात मोठी शिक्षा द्यावी, असे त्याला वाटू लागले. त्यामुळे त्याने आयर्लंड सोडले आणि पुन्हा मातृभूमीचे दर्शन न घेण्याचा ठाम निश्चय केला.

जड अंत:करणाने कोलंबाने आपल्या मित्रांचा, मातृभूमीचा आणि त्याच्या दु:खाचे कारण बनलेल्या हस्तलिखित पुस्तकाचा निरोप घेतला. मग तो आपली बोट, *डेली रेड,* मध्ये बसून सोबत बारा सहकारी आणि लाडका हंस यांना घेऊन शिक्षा भोगण्यासाठी उत्तर दिशेला एका अनोळखी बेटाकडे निघाला.

कोलंबा अनेक बेटांवर भटकत राहीला. पण त्या सर्व बेटांवरून दक्षिण दिशेला आयर्लंडचे दर्शन होत होते. मग तो आणखी दूर गेला. पण तिथूनही त्याला निसर्गरम्य हिरव्या शालूत लपेटलेल्या परमप्रिय आयर्लंडचे दर्शन झाले. शेवटी तो *आयोना* बेटावर पोहोचला. तेथील सर्वोच्च टेकडीवर चढून त्याने दक्षिणेकडे पाहिले. त्याला सभोवती फक्त समुद्रच समुद्र दिसला. कोलंबाला आपले नवे घर एकदाचे सापडले.





कोलंबा आणि त्याच्या मित्रांनी तिथे एक चर्च, त्याच्या सभोवती प्रत्येकाला राहायला एक, अशी तेरा घरे आणि घरांभोवती एक भिंत बांधली. कोलंबाच्या या शहरात सर्व एका कुटुंबासारखे राहू लागले. काळानुसार, या कुटुंबात अधिकाधिक लोकांची भर पडू लागली. कारण कोलंबाचे शेजारच्या बेटांवरील लोकांबरोबरच आजुबाजूच्या इतर बेटांवरील लोकांशी, एवढेच नाही तर स्कॉटलंडच्या लोकांशीही मैत्रीपूर्ण नाते होते. आपल्या उत्तरेकडील दौऱ्यात त्याने प्रवचने दिली आणि लहानलहान चर्च उभारले. त्याने स्कॉटलंडच्या दीर्घ दौऱ्यात तेथील राजाला ख्रिश्चन धर्माचा स्वीकार करण्यास प्रोत्साहीत केले.

अर्थात, कोलंबाला आपल्या मातृभूमीची खूप आठवण येत असे. दक्षिण दिशेकडे उडत जाणाऱ्या पक्ष्यांचा त्याला हेवा वाटत असे. शिवाय, नवीन पुस्तकांमुळे मिळणाऱ्या आनंदालाही तो पारखा झाला होता. पण त्याच्याकडे सर्वात महत्त्वाचे पुस्तक, बायबल, होते. प्रत्येक चर्चमध्ये बायबलची एक प्रत असावी, अशी त्याची इच्छा होती. म्हणून, तो अहोरात्र बसून बायबलच्या प्रती लिहू लागला. अपार कष्ट करून त्याने अशा तीनशे प्रती हाताने लिहून काढल्या.



कोलंबा आता सत्तर वर्षांचा झाला. गेली अठ्ठावीस वर्षे तो आयोनामध्येच राहात होता. एकदा आयर्लंडहून काही जहाजे त्याच्या बेटावर आली. कोलंबा त्वरित त्यांच्या स्वागतासाठी किनाऱ्याकडे धावला. जहाजांवर वीस धर्मोपदेशक, चाळीस पुजारी आणि तीस अनुयायी होते. सर्व नव्वद प्रवासी आयरीश होते. कोलंबाने सर्वांची गळाभेट घेतली. आयर्लंडमध्ये मोठा कठीण काळ आल्यामुळे ते सर्व इथे आले होते. तेथील भाट लोक लोभी झाले होते. मिळणाऱ्या पैशात ते समाधानी नव्हते. त्यांनी चक्क राजाला त्याचे शाही कडे देण्याचे आदेश दिले. राजाने नकार दिल्यास त्याची निंदा करणारी गीते प्रजेसमोर गाऊन त्याची प्रतिमा खराब करण्याची धमकी त्यांनी राजाला दिली. मग राजाने एक सभा आयोजीत करून सर्व भाटांना राज्याबाहेर हाकलण्याचा निर्णय घेतला.



हे सर्व ऐकून कोलंबाला मोठा धक्का बसला. भाट लोक इतके कसे वाईट वागले! पण हद्दपारी! भाटांशिवाय आयर्लंडच्या अस्तित्वाला काय अर्थ राहील? त्यांच्या कथा-कहाण्या, गीतांशिवाय आयर्लंडच्या पुढच्या पिढ्या कशा तयार होतील? कल्पनाही करवत नाही.

“तुम्ही आमच्यासोबत चला,” त्या सर्वांनी कोलंबाला आर्जवे केली.

“तुम्ही सभेत आपले मत मांडा. केवळ तुम्हीच राजाला आणि भाटांना समजावू शकता.”

पण कोलंबा आयर्लंडला जाण्याचा विचारच करू शकत नव्हता. त्याने तशी शपथच घेतली होती.

पण मातृभूमीच्या मदतीसाठीही जायचे नाही का?

कोलंबा रात्रभर तळमळत राहीला. आपल्या शपथेवर विचार करत राहीला.



शेवटी त्याला उपाय सापडला. त्याने आयर्लंडवर पाऊल ठेवायचे नाही, अशी तर शपथ घेतली नव्हती ना? आयर्लंडचे दर्शन न घेण्याची शपथ त्याने घेतली होती. मग डोळ्यांवर पट्टी बांधून तो सर्वांसोबत आयर्लंडला निघाला. तो पहिल्या जहाजाच्या अगदी पुढच्या टोकावर जाऊन बसला. मातृभूमीच्या जवळ पोहोचल्याची अनुभूती त्याला घ्यायची होती.



कोलंबा आयर्लंडला पोहोचला तेव्हा सभा सुरू झाली होती. आयर्लंडमधील सर्व प्रांतांचे राजे, आदरणीय व्यक्ती, चर्चचे धार्मिक लोक आणि बाराशे भाट तिथे उपस्थित होते. डोळ्यांवर पट्टी बांधलेल्या कोलंबाला पाहाताच, ते सर्व त्याच्या सन्मानार्थ उठून उभे राहिले. कोलंबा बोलू लागताच, सगळे एकमेकांकडे पाहून स्मित करू लागले. कोलंबाच्या करारी आवाजामध्ये आणि भाषणामध्ये काहीही फरक पडला नव्हता, ना डोळ्यांवरच्या पट्टीमुळे, ना सरलेल्या मधल्या मोठ्या काळामुळे. कोलंबाने आपल्या मधुर शब्दांनी राजे आणि भाट या दोहोंना संतुष्ट केले. सभेच्या शेवटी भाटांनी नियमांचा स्वीकार करण्यास मान्यता दिली. राजांनीही त्यांना देशात राहाण्यास परवानगी दिली.

मग कोलंबा आयोनाला परतला. आपल्या मातृभूमीला जाण्याची त्याची इच्छा पूर्ण झाली होती. मातृभूमीच्या धुळीचा स्पर्श त्याच्या पावलांना झाला होता. तेथील मातीचा गंध त्याच्या नसानसांत साठला होता. भाटांनी गायलेली जुनी गीतं आणि कथा त्याने ऐकल्या होत्या.

आता तो आपल्या बेटावर परतून डोळ्यांवरील पट्टी काढण्यास आतुर झाला होता. आयर्लंडच्या धर्मोपदेशकांनी त्याला दिलेली दुर्मीळ भेट, एक नवे पुस्तक त्याला वाचायचे होते.

यानंतर कोलंबा आणखी सहा वर्षे जगला. तो आपले कुटुंब आणि काम यांतच आनंदी राहात असे. मृत्यसमयी तो त्याचे सर्वात आवडते काम करत होता. त्याच्यासोबत त्याची ताडपत्री, त्याच्या लेखण्या आणि शाई या वस्तू होत्या. एक वाक्य लिहून काढत असताना मध्येच त्याचा श्वास कायमचा थांबला.

लेखकाचे मनोगत

कोलंबा इ.स. 521 साली जन्मलेला आयरीश संत होता. ही कथा एका जुन्या दंतकथेवर आधारीत आहे. त्यातील बराचसा भाग सत्य असल्याचे मानले जाते. कोलंबाला त्याच्या पुस्तकांवरील प्रेमासाठी आणि सेवाभावी कार्यासाठी संपूर्ण स्कॉटलंडमध्ये ओळखले जात असे.

इ.स. 563 साली तो आणि त्याचे सहकारी आयोना बेटावर स्थायिक झाले.